RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

बुधवार, १९ मार्च २०२५ | वर्ष : ५ | अंक : ८३ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Wednesday, 19 March 2025 | Year : 5 | Issue : 83 | Daily | Rate: Rs. 5/-







## शांततेला गालबोट




**नागपूर :** नागपुरातील महाल परिसरात सोमवारी रात्री दोन गटात संघर्ष पेटल्याने तणाव निर्माण झाला होता. जमाव नियंत्रित करण्यासाठी पोलिसांना अश्रूधुराच्या नळकांड्या फोडण्यासह सौम्य लाठीमारही करावा लागला. या अश्रूधुराच्या नळकांड्याचा धूर भालदारपुरातील एका घरात शिरला. त्यामुळे एकाच कुटुंबातील दोन चिमुकल्यांचा श्वास गुदमरल्याने एकाच खळबळ उडाली. प्रकृती खालवलेली बालके 4 महिणे आणि सहा महिणे वयाची आहे. विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाने औरंगजेबची कबर हटवण्यासाठी सोमवारी नागपुरात केलेल्या आंदोलनानंतर रात्री आठ वाजताच्या सुमारास महाल परिसरात दोन गटात संघर्ष पेटला. जवळपास चार तास महाल परिसर, चिटणीस पार्क परिसर यासह अन्य ठिकाणी तुफान दगडफेक, तोडफोड, रस्त्यावर जाळपोळ आणि नारेबाजी करण्यात आली. परिस्थितीवर नियंत्रणासाठी पोलिसांनी आटोकाट प्रयत्न केले. मात्र परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्यामुळे पोलिसांना अश्रूधुराच्या नळकांड्या फोडाव्या लागल्या तर लाठीमार सुद्धा करावा लागला. रात्री उशिरापर्यंत पोलिसांची असामाजिक तत्त्वांची धरपकड सुरू होती. हिंसाचारानंतर नागपूर पोलिसांनी महल परिसरात मोठ्या प्रमाणावर शोधमोहीम राबवली, ज्यामध्ये आतापर्यंत 15 जणांना अटक करण्यात आली असून 50 हून अधिक लोकांना ताब्यात घेण्यात आले आहे. दरम्यान अश्रूधुराच्या नरकांड्याचा धूर भालदारपुरातील एका घरात शिरला. घरात चार महिने आणि सहा महिने वयोगटातील मुले बिछाण्यावर खेळत होती. धुर नाका- तोंडात गेल्याने दोघांचाही श्वास गुदमरला. तातडीने कुटुंबियांनी त्यांना उपचारासाठी सक्करदरा परिसरातील डॉ. खळतकर रुग्णालयात दाखल केले.







> “ नागपूरचे सीपी सर यांच्या नेतृत्त्वात आणि एसआरपीएफ जवनांच्या मदतीने नागपूरची परिस्थिती हाताळली गेली. दंगल झाली त्या विभागात खूप अरुंद गल्ल्या आहेत. त्या प्रत्येक रस्त्यांवर दगडफेक सुरू होती. त्यांच्याकडे शस्त्र, काठ्या, पेट्रोलच्या बॉटल्स होत्या. त्यामुळे आम्ही पुढे जाऊन त्यांना मागे करण्याचा प्रयत्न करत होतो. एका संशयित हल्लेखोराला शोधण्यासाठी एक टीम एका घरात गेली. तेवढ्यात शेकडोने माणसे जमा झाली. ती टीम घरात होती, तर मी बाहेर होतो. करायचे काय ? जमावाने घरावर हल्ला केला असता तर मोठी अप्रिय घटना घडली असती.
> — निकेतन कदम

> “ गेल्या काही आठवड्यांत महाराष्ट्र सरकारचे मुख्यमंत्री आणि इतर मंत्री जी विधाने करत आहेत ते पाहण्याची गरज आहे. सरकारकडून अत्यंत भडकाऊ विधाने येत आहेत. त्यांना आपली जबाबदारीही कळत नाही की ते मंत्री आणि मुख्यमंत्री आहेत. त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात एका खास बादशाहाचे पुतळे जाळले, त्यावर काही प्रतिक्रिया आली नाही आणि त्यांना हे आवडले नाही. त्यामुळे त्यांनी कपड्यावर कुराण च्या ओळी लिहून जाळल्या. हे होत असताना हिंदू आणि मुसलमानांनी डीसीपीकडे तक्रार केली. त्यांनी कोणतीही कारवाई केली नाही त्यानंतर हिंसाचार झाला. हे सरकार आणि गुप्तचर विभागाचे अपयश आहे. जे झाले ते योग्य नाही. `हिंसाचार झाला. हे सरकार आणि गुप्तचर विभागाचे अपयश आहे. जे झाले ते योग्य नाही.
> — असदुद्दीन ओवेसी

> “ औरंगजेबाची कबर हटवण्याच्या मागणीसाठी विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाने आंदोलन करण्याचे नियोजित केले होते. तसेच महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांना यासंदर्भातील निवेदन देण्याचे ठरले होते, त्यानुसार आंदोलन आणि जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देखील देण्यात आले. मात्र, औरंगजेबाला मानणाऱ्या काही लोकांनी नागपूरात अफवा पसरवली. त्यांचा हेतू हा हिंसा करण्याचा होता. अशा जिहादी लोकांवर कडक कारवाई झालीच पाहिजे, अशी मागणी आम्ही विश्व हिंदू परिषदेच्यावतीने करत आहेत.` नागपूरातील हिंसा नियोजित कट होता, औरंगजेबाला मानणाऱ्या लोकांनी अफवा पसरवल्या', असा आरोप विश्व हिंदू परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे., असे विश्व हिंदू परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

> “ आम्ही पोलिसांना पूर्णपणे मदत करायला तयार आहोत. माझ्या दोन्ही भावांची काहीही चूक नाही. वडिलांचा दहावा दिवस असल्याने ते दिवसभर घरीच होते. परंतु कुठलीही चौकशी न करता त्यांना पकडून नेण्यात आले. त्यांच्यावर अमानुष अत्याचार केला. आमच्या संपूर्ण घराचे नुकसान केले. आम्ही भारताचे नागरिक आहोत. आम्ही येथील व्यवस्थेला पूर्णपणे मदत करायला तयार आहोत. मात्र, पोलीसच आज आमचे शत्रू होत असतील तर आम्ही दाद कुणाला मागायची. काहीही करा, पण, माझ्या भावांना परत आणून द्या. त्यांचा काहीही दोष नाही अशी आर्त हाक नुसरा यांनी दिली.

## शासकीय दंत महाविद्यालयातील अधिष्ठाता डॉ. दातारकर यांना बडतर्फ करा : डॉ. नितीन राऊत

**नागपूर :** शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय येथे बीडीएसच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना अधिष्ठाता डॉ. अभय दातारकर यांनी प्रात्यक्षिक परीक्षेत पाहून घेण्याची धमकी देऊन सुळबुध्दीने इंटरनल गुण कमी केले व एक्ट्रनल मिळालेले गुणांमध्येही हस्तक्षेप करून विद्यार्थ्यांना नापास केले. विद्यार्थ्यांना झालेल्या मानसिक छळ प्रकरणी आज विधानसभेत राज्याचे माजी मंत्री आणि आमदार डॉ. नितीन राऊत यांनी अधिष्ठाता यांना तात्काळ बडतर्फ करून चौकशीची मागणी केली आहे. प्राप्त माहितीनुसार, शैक्षणिक सत्र 2024-25 मध्ये बीडीएसच्या अंतीम वर्षातील विद्यार्थ्यांच्या संपुर्ण बॅचला अधिष्ठाता डॉ. दातारकर यांच्या व्दारे मानसिक छळ सहन करावा लागला. डॉ. दातारकर यांनी जाणीवपुर्वक संपुर्ण 60 विद्यार्थ्यांचे इंटर्न बॅचला चुकीचे इंटर्नशिप पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र दिले. यामुळे संपूर्ण बॅच राज्य परिषदेत नोंदणीसाठी अपात्र ठरली. तसेच यांनी विद्यार्थिनींच्या बॅचवर विविध चौकशी लावून छळ केला असल्याचा आरोप यावेळी डॉ. राऊत यांनी केला. अधिष्ठाता इतक्यावरच थांबले नसून प्रामाणिक विद्यार्थ्यांवर कमी उपस्थितीचा आरोप त्यांनी केला. सुळबुध्दीने डॉ. दातारकर यांनी विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या प्रवेश पत्रावर 'नॉट एलिजिबल टू अपियर फॉर एक्झाम' असे लाल पेनानी लिहलेले प्रवेश पत्र विद्यार्थ्यांना जारी केले होते. यावेळी विद्यार्थी आणि पालक अधिष्ठाताच्या आडमुठे धोरणाविरोधात रोष व्यक्त करित त्यांच्या कार्यालयापुळे उभे राहून त्यांच्या या वृत्तीचा निषेध नोंदविला. यावेळी विद्यार्थ्यांचे महत्त्वाचे तास वाया गेले. प्रसंगी डॉ. राऊत यांनी जनप्रतिनिधी म्हणून हस्तक्षेप केला त्यावेळी अधिष्ठाता यांनी युटर्न घेत 'एलिजिबल टू अपियर फॉर एक्झाम' लिहिलेले प्रवेश पत्र विद्यार्थ्यांना जारी केले. यावेळी डॉ. दातारकर यांनी विद्यार्थ्यांना प्रॉक्टीकल मध्ये तुम्ही किती मार्क घेता हे बघतो असे म्हणत विद्यार्थ्यांना धमकी दिली. कायदा पायदळी तुडविण्याची प्रवृत्ती अधिष्ठाताची दिसून येत असल्याचा आरोप यावेळी डॉ. राऊत यांनी विधानसभेत केला. 11 मार्चला लागलेल्या निकाला मध्ये राज्यातील 34 दंत महाविद्यालयांमध्ये नागपूर येथील महाविद्यालयाचा परिणाम सर्वात वाईट होता. अधिष्ठाताच्या सततच्या छळामुळे अनेक विद्यार्थी परीक्षेत नापास झाले आणि उर्वरित उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची कामगिरी चांगली नव्हती. विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक परीक्षेत कमी गुण देवून व एक्टरनल परीक्षेत हस्तक्षेप करून त्यांचे गुण कमी करण्यात आल्याचा आरोप देखील यावेळी करण्यात आला. यामुळे आता विद्यार्थ्यांना त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचे सहा महिनेच नाही तर नीट-एमडीएस परीक्षेच्या प्रतीक्षेत आणखी एक वर्ष वाया जाण्याची भीती यावेळी डॉ. राऊत यांनी दर्शविली आहे.



## समाजाचा आधार सिद्ध झाली बीडीएसपी संघाची धम्म कार्यशाळा : प्रा. सरोज वाणी






**नागपूर :** हजारो जनसागरांच्या उपस्थित कळमेश्वर येथे झालेल्या बीडीएसपी संघाच्या धम्म कार्यशाळेत प्रा. सरोज वाणी आपले मत मांडताना स्पष्टच म्हणाल्या, 'आता माझे सुद्धा ठाम मत झाले की दुःखी कष्टी जीवन जगणाऱ्या या बहुजनांचा आधार फक्त आणि फक्त डॉ. बाबासाहेबांनी दिलेला धम्म जीवन मार्गच होवु शकतो. चुकिच्या रुढी परंपरा बहुजनांचा जीव घेत असतांना सुद्धा त्यांच्या मानसिक गुलामिने हे त्यांच्या लक्षातच येत नाही की या रुढी परंपरा आमचा जीव घेत आहे. अशा या मानसिक गुलामीत जखडलेल्या बहुजनांना स्वतंत्र करण्याची ताकद फक्त आणि फक्त डॉ. बाबासाहेबांच्या धम्म जीवन मार्गातच आहे. म्हणून या धम्म जीवन मार्गाचा प्रत्येक शेवटच्या व्यक्ती पर्यंत प्रचार व प्रसार होणे अत्यंत गरजेचे आहे व हे पुण्य कार्य बीडीएसपी संघ त्याच्या संपूर्ण शक्तीनिशी करीत आहे. डॉ. सिद्धार्थ बोधी (गायकवाड) आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की, बीडीएसपी संघ हा मोठ्यांचीच धम्म कार्यशाळा घेत नसुन लहान मुलांची सुद्धा बाल संस्कारांच्या माध्यमातून काळजी घेत आहे, हे बघून मी आनंदित झालो आहे. यामुळेच बाबासाहेबांना अपेक्षित असलेला आदर्श समाज घडणार आहे, हे नक्कीच. डॉ. निकेतन जांभुळकर यांनी ही बाब अधिक स्पष्ट करतांना हे आवर्जून सांगितले की अशा प्रकारचे बाल संस्कार शिबिर संस्कारक्षम समाज घडविण्यासाठी फार उपयोगी ठरणारे आहे. त्यामुळे प्रत्येक भागात हे घडुन आणण्यासाठी बीडीएसपी संघाने विचार करावा. डॉ. निरज बोधी आपल्या प्रबोधनात म्हणाले की, पालि भाषा ही संस्काराची जननी आहे. त्यामुळे ती समाजात रूजावी म्हणून बीडीएसपी संघाने त्या दृष्टीने कार्य करावे. समाजाभिमुख कार्य करणाऱ्या चोखांदळे यांना व प्रमोद काळबांडे यांना या धम्म कार्यशाळेत सन्मानित सुद्धा करण्यात आले. बहुजन सौरभचे डॉ. सिद्धार्थ कांबळे, धम्म कार्यशाळेला संबोधित करतांना म्हणाले की, बहुजन सौरभची निर्मिती सुद्धा बहुजनांच्या यातनांना बोलके करण्यासाठीच झालेली आहे. विकास जांभूळकरांनी शील सदाचारावर मार्गदर्शन केले. बाल संस्कार शिबिरामध्ये अशोक वाठोरे यांनी आपल्या देशातील समाज सुधारकांची माहिती मुलांना दिली. रोषनी बोधी यांनी बाल संस्कार शिबिराचे व्यवस्थापनाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. सरोज आगलावे व उषा बौद्ध यांनी सुद्धा धम्माची आवश्यकता यावर आपले मत मांडले. संध्या राजुरकर यांनी स्त्रीशक्ती ही आपल्या देशातील व्यवस्थेने वाया चालली होती. तिला खरा न्याय बुद्धांनी दिला असे मत मांडले. या दोन्ही कार्यक्रमांचे संचालन भिमा बागडे, करूणा गजभिये व सानिया धारगावे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रृती गजभिये यांनी केले.

## वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**डॉ. अंकिता मोरेश्वर पाटील**

(MBBS, MS) मुंबई
जन्म तारीख : 19/03/1997

आज तुझा वाढदिवस
वाढणाऱ्या या
प्रत्येक दिवसागणिक
तुझे यश, तुझे ज्ञान, तुझी किर्ती
वृद्धिंगत होत जावो आणि सुख
समृद्धीचा बहर,
तुझ्या आयुष्यात नित्य येत राहो.





: शुभेच्छूक :

मोरेश्वर पाटील (वडिल), अनिता पाटील (आई), मानसी पाटील (बहिण), रिता आटे (मावशी), हरिश आटे (काकाजी), धर्मपाल पाटील (काका), कुंदा पाटील (काकू), विनोद दमके (मामा), लता दमके (मामी), नरेंद्र दमके (मामा), वैशाली दमके (मामी). मो. ९६२३३००२१८






## संपादकीय

# नागपूर एक ऐतिहासिक नगर आणि दंगलीचे गालबोट ?

नागपूर शहर ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाचे व सुप्रसिद्ध तसेच सुरक्षित शहर आहे. येथे नाग वंशी लोक राहत होते म्हणून नाग नदी आहे. नागपूर नाव हे सुध्दा नाग वंशी लोकांमुळे पडले. नागवंशी लोक बौद्ध धम्म पाळणारे शांतताप्रिय लोक होते. तसेच ऐतिहासिक नागार्जुन टेकडी रामटेक भागात आहे. आधुनिक काळात 1925 ला राष्ट्रीय स्वयंमसेवक संघ यांची नागपुरात स्थापना झाली. त्यांचे मुख्यालय नागपुरात आहे.तर 1956 ला डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्म दिक्षा नागपुरात घेतली. ऐतिहासिक दिक्षा भूमी नागपुरात आहे.

गोंड राजा देवगड-नागपूर साम्राज्याचे राजकुमार बख्त बुलंद यांनी नागपूरची स्थापना केली, असे सांगितले जाते. रघुजी राजे भोसले, ज्यांना रघुजी भोसले प्रथम किंवा राघोजी भोसले म्हणूनही ओळखले जाते, हे भोसले घराण्याचे एक महत्त्वाचे व्यक्तिमत्व होते, ज्यांनी छत्रपती शाहू यांच्या कारकिर्दीत पूर्व-मध्य भारतात नागपूर राज्याची स्थापना केली. महाराष्ट्राची हिवाळी राजधानी असलेले नागपूर हे अतिशय झपाट्याने विकसित होत असलेले आणि मुंबई व पुण्यानंतर राज्यातील तिसरे मोठे शहर आहे. 2011 च्या जनगणनेनुसार या शहराची लोकसंख्या 46,53,570 इतकी होती. नागपूर शहराचा भौगोलिक भूभाग देशाच्या नागरी प्रदेशातील 13 वा मोठा भूभाग आहे. महाराष्ट्रातील भव्य शहर नागपूरला 'संत्र्याचे शहर' म्हणूनही ओळखले जाते. शेवटी, संत्र्यांसाठी प्रसिद्ध असलेले नागपूर देशभरात या फळांचा पुरवठा करते. मुंबई आणि पुण्यानंतर, हे राज्यातील तिसरे सर्वात मोठे शहर आहे. महाराष्ट्रात विचित्र वातावरण निर्माण झाले आहे. हलाल मटण की झटका मटण. हा एक वाद आहे. औरंगजेब कबर महाराष्ट्रात नको हा एक मोठा विषय सुरू आहे. काल नागपूर शहरात औरंगजेबाच्या कबरीचा वाद अखेर जाळपोळीपर्यंत गेला आहे. नागपूरात दोन गटांनी समोरासमोर येत दगडफेक आणि जाळपोळ केल्याने तणावाचे वातावरण पसरले होते. यानंतर पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली असून आता तणावपूर्ण शांतता आहे. एका बाजूच्या लोकांनी जवळपास 30 ते 35 कार्यकर्त्यांनी दुपारी एक वाजता महाल कडबी चौकात औरंगजेबाचे छायाचित्र आणि प्रतिकात्मक कबर तयार केली. औरंगजेबाच्या छायाचित्राला चपलेने मारून निषेध व्यक्त केला. दुपारी दोन वाजता औरंगजेबाच्या प्रतिकात्मक कबरेला पेटविण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्या कबरेवर एका धर्मासाठी पवित्र मानण्यात येणारी हिरवी चादर टाकण्यात आली होती. त्यावर कुराणाच्या आयात लिहिलेल्या होत्या. ती चादर पेटवल्याची चर्चा सर्वत्र पसरली. औरंगजेबाची प्रतिकात्मक कबरेवरील हिरव्या रंगाची चादर जाळल्याचे काही छायाचित्र समाजमाध्यमांवर प्रसारित केले गेले. आणि भावना भडकविल्या गेल्या अशी माहिती मिळाली. वास्तविक पाहता नागपुरात हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शीख, ख्रिश्चन गुण्या गोविंदाने राहतात. येथे असलेल्या ताजुद्दीन बाबा दर्ग्यात सर्व धर्माचे लोक दर्शनास जातात.

नागपुरात हिंदू मुस्लिम असा वाद नव्हता व नाहीच. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका येत आहेत त्यासाठी धार्मिक ध्रुवीकरण केले जात आहे. बौद्ध बुद्ध गया महाबोधी विहार आंदोलन सुरू आहे तिकडचे लक्ष वळवायचे आहे. म्हणून धार्मिक दोन गटांना लढविल्या जात आहे. मुख्यमंत्री व गृहमंत्री नागपुरचे आहेत त्यामुळे नागपूरला शांत ठेवने त्यांच्या प्रतिष्ठेचा विषय सुद्धा आहे. पोलिस यंत्रणेची फार मोठी जबादारी आहे मोर्चा ची परवानगी देताना. मोर्चा कस्तुरचंद पार्क वरून जिल्हाधिकारी कार्यालया पर्यंत द्यायला पाहिजे. लोकवस्ती मधून मोर्चा काढणे साठी परवानगी देताना विचार करायला पाहिजे होता. देऊच नये. नागपूची जनता प्रगल्भ आहे त्यांनी नव संकुचित विचार सरणी सोडून दिली पाहिजे. पूर्वी नागपूर जसे होते तसेच आजही दिसावे. मेले मुडदे उखडणे सोडून दिले पाहिजे. आधुनिकतेची कास धरली पाहिजे. ■ ■

बहुजन सौरभ

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रा.स्व. संघ आणि आम्ही लोक

**दीक्षाभूमी असलेले नागपूर हे शांतताप्रिय शहर म्हणून जगात ओळखले जाते. या शहराची 'शांतताप्रिय' ही ओळख मिटविण्याचे षडयंत्र रा. स्व. संघ समर्थक फ्रींज एलिमेंटने रचले आहे. औरंगजेबाच्या कबरीचे निमित्त करून नागपूरमध्ये 'स्टेट स्पॉन्सर्ड' दंगल घडविण्याचा प्रयत्न करण्यात आला. संघाचे षडयंत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ओळखले होते.**

'हिंदुराष्ट्र जर खरोखर प्रत्यक्षात आले तर देशासाठी ते एक भयानक संकट असेल. हिंदू काहीही म्हणोत या हिंदू राष्ट्रामुळे स्वातंत्र्य, समता आणि बंधुता धोक्यात येईल. लोकशाहीशी त्याचा मेळ बसत नाही. वाटेल ती किंमत देऊन हिंदू राष्ट्राला रोखले पाहिजे', असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'थॉट्स ऑन पाकिस्तान' या प्रसिद्ध ग्रंथात म्हटले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ज्यांना आपला सर्वात मोठा ऑयकॉन समजते, ते सरदार वल्लभभाई पटेल म्हणाले होते, की 'माझ्या मते भारत ना हिंदुराष्ट्र बनू शकत, ना हिंदू धर्म भारत सरकारचा धर्म बनू शकत. कुणाचा कोणताही धर्म असो वा जात, हा देश सर्वांचा आहे. पाकिस्तान ज्या मार्गावर चालत आहे, त्या मार्गाने आम्ही जाऊ शकत नाही.' सरदार पटेल यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना संविधान सभेत प्रवेश करण्याला प्रखर विरोध होता, हे सर्वविदित आहे. मात्र; नाथुराम गोडसे व इतर हिंदुत्ववाद्यांनी कट करून महात्मा गांधी यांचा खून केल्यावर भारत सरकारने आरएसएसवर बंदी घातली होती. ती बंदी उठविण्याकरिता जेव्हा तत्कालीन सरसंघचालक मा. स. गोळवलकर हे डॉ. आंबेडकरांना 1949 मध्ये भेटले होते. त्यावेळी गोळवलकर यांना डॉ. आंबेडकर म्हणाले की, सरदार पटेल यांना देशाची परिस्थिती नीट माहिती आहे अणि ते योग्य निर्णय घेतील. संघ जर हिंदूंना एकाच निशानाखाली संघटित करण्याशी प्रामाणिक असेल तर त्यांनी जातिव्यवस्था नष्ट करायला हवी', असे त्यांनी गोळवलकरांना सुनावले होते.

**काँग्रेस आणि हिंदुत्वाचा प्रेमालाप :-** संघाबाबत डॉ. बाबासाहेब, नेहरू, पटेल आणि महात्मा गांधी यांच्यात मतभिन्नता नव्हती. हे सर्वजण धर्मनिरपेक्ष व लोकशाही समाजवादी देश उभारणी करण्याच्या बाजूने होते. धर्मनिरपेक्ष देश म्हणजे सरकारचा कोणताही धर्म असणार नाही आणि लोकशाही समाजवाद म्हणजे दलित, आदिवासी, ओबीसी, मुसलमान, सवर्ण या सर्वांमधील पीडित, रंजल्या-गांजल्यांसाठी कल्याणकारी शासन व्यवस्था निर्माण करणे होय. त्यामुळे शास्त्रीय समाजवादाचे भारतीय पितामह मानवेंद्रनाथ रॉय यांनी त्याकाळातच धार्मिक फॅसिझमचा विरोध केला होता. मुसोलिनी, हिटलर, फ्रॅन्को आदी सर्वच फॅसिस्ट लोकशाही, धर्मनिरपेक्षता, समाजवाद, साम्यवाद आदी गोष्टींना शत्रू क्रमांक एक असल्याचे मानत होते. सत्ता हस्तगत केल्यावर दि. 21 जून 1921 रोजी संसदेत मुसोलिनी म्हणाला की, आम्ही आपल्या सर्व शक्तिनिशी समाजीकरण, शासकीयकरण आणि सामूहिकीकरणाच्या प्रयत्नांचा विरोध करू. शासकीय समाजवादाची आपण जागा घेतली पाहिजे, तर 'माईन काम्फ' या आपल्या आत्मचरित्रात हिटलर म्हणतो की, जी गोष्ट मुसोलिनीचा आजच्या महापुरुषांच्या यादीत समाविष्ट करते, ती गोष्ट म्हणजे इटलीमध्ये मार्क्सवादाच्या भागीदारीला नाकारण्याचा निश्चय, त्याचा विनाश आणि आंतरराष्ट्रीयवादापासून आपल्या देशाचे संरक्षण करणे होय (पान 679).





मिलिंद कीर्ती
मो. 9405325048

भारतातील आरएसएसदेखील समाजवाद, साम्यवाद आदी सर्व गोष्टींच्या विरोधात असून फॅसिस्ट, धर्मांध आहे. त्यामुळे गांधी, डॉ. आंबेडकर, नेहरू, पटेल हे सर्वजण त्या काळात हिंदू असूनही बहुसंख्यांकवादी ब्राह्मणी व धर्मांध हिंदुराष्ट्र स्थापन करण्याच्या बाजूने नव्हते. भारत हे 'हिंदुराष्ट्र' बनविण्याला त्या सर्वांचा सक्त विरोध होता. म. गांधी यांचे हिंदुत्ववादी पंडित मदनमोहन मालवीय यांच्याशी जिव्हाळ्याचे संबंध होते. वारंवार विनंती करण्यात आल्यानंतर महात्मा गांधी यांनी संघाच्या दिल्ली शाखेला दि. 16 सप्टेंबर 1947 भेट दिली होती. त्या भेटीचा वृत्तांत त्यांचे स्वीय सहाय्यक प्यारेलाल यांनी नोंदवून ठेवला आहे. या संघ शाखा भेटीप्रसंगी म. गांधी म्हणाले होते, की 'मला हिंदू असल्याचा अभिमान आहे. पण माझा हिंदू धर्म असहिष्णू किंवा बहिष्कृत नाही. जर हिंदू असे मानत असतील, की हिंदुस्थानात अहिंदूंना समान व सन्माननीय स्थान नाही आणि मुसलमानांना भारतात राहायचे असल्यास, त्यांना हीन दर्जावर समाधान मानावे लागेल, तर यामुळे हिंदू धर्म अर्थहीन होईल. मुस्लिमांच्या हत्येमध्ये तुमच्या संघटनेचा (संघाचा) हात असल्याचा तुमच्यावर होणारा आरोप खरा असेल, तर त्याचे परिणाम वाईट होतील, याचा मी तुम्हाला इशारा देतो,' असे त्यांनी निक्षूण सांगितले होते. असे असले तरी गांधी यांच्या हत्येनंतर काही काळातच सरदार पटेल यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेस केंद्रीय वर्किंग कमेटीने रा. स्व. संघाला काँग्रेसमध्ये प्रवेश देण्याचा ठराव पारित केला होता. परंतु तो ठराव पुढे बारगळला. ज्या काळात संघाची स्थापना झाली, त्यावेळी पंडित जवाहरलाल नेहरू यांचे वडील तथा काँग्रेस नेते मोतीलाल नेहरू म्हणाले होते, की 'स्वातंत्र्य लढ्याच्या काळातील काँग्रेसचे स्वरूप मूलतः हिंदुत्ववादी होते.' त्या काळात काँग्रेसमध्ये वेगवेगळ्या विचारधारेचे लोक होते. परंतु बाळ गंगाधर टिळक यांचा मृत्यू झाल्यानंतर महाराष्ट्रातील हिंदुत्ववादी एक-एक करीत काँग्रेसमधून बाहेर पडत गेले. त्यानंतरही काँग्रेस नेते आणि हिंदुत्ववादी यांचे संबंध संपुष्टात आल्याचे दिसत नाही.

मी येथे भारतीय फॅसिझमच्या तत्त्वज्ञानाची चर्चा करणार नाही. त्याबाबत आधीच्या लेखांमध्ये काही गोष्टी मांडल्या आहेत. भारतीय फॅसिझम हा सध्याच्या जर्मनी, फ्रान्स, स्पेन, रशिया, युक्रेन, अमेरिका आदी विविध देशांमधील न्यू फॅसिझमपेक्षाही वेगळा आहे. अस्पृश्य, आदिवासी व शूद्र ओबीसी यांच्यावर गुलामगिरी लादणाऱ्या आणि स्वतंत्र, स्वाभिमानी जीवनापासून ते जिवंत राहण्याकरिता आवश्यक अर्थाजन करण्यावर बंदी लादणाऱ्या जातिव्यवस्थेच्या अंमलबजावणीमुळे भारतात फॅसिझमसाठी आधीच सुपीक जमीन उपलब्ध आहे. भारतीय समाज खऱ्या अर्थाने लोकशाहीच्या अनुरूप नाही. येथील सत्ताधारी व सामान्य लोकांचे संबंध राजा-प्रजा याप्रमाणे आहेत. दाता-याचक असा हा व्यवहार आहे. या लोकांना कोणत्या तरी, मग ते ब्राह्मण, क्षत्रिय असो की, ग्रीक, मंगोल, तुर्क असो वा ब्रिटिश, फ्रेंच, पोर्तुगीज असो, या वरच्या श्रेष्ठ वर्गाचे आदेश पाळण्याची सवय आहे. 'हिरो वर्शिपिंग' म्हणजे व्यक्तिपूजा हा भारतीय समाजाला जडलेला प्रमुख रोग आहे. त्यामुळे हे लोक देशाचे नागरिक म्हणून आपले नागरी हक्क आणि जबाबदाऱ्यांप्रती सजग नाहीत. या प्रजेला लोकशाही चालविणारा राजा किंवा हुकूमशहाची आवड आहे. हे सर्व वातावरण (व्यवस्था) फॅसिस्ट नेता उपलब्ध करीत असतो. जेव्हा 2014 मध्ये आरएसएसप्रणित भाजपचे पूर्ण बहुमताचे सरकार आले, तेव्हा आरएसएसने भारत आता स्वतंत्र झाल्याचे लोकांना सांगितले. प्रत्यक्षात भारत 1947 मध्येच स्वतंत्र झाला आहे. डॉ. भागवत आणि मोदीच्या वक्तव्यातून आरएसएस ही केवळ संघटना नसून एक वृत्ती असल्याचे दिसून येते. ही प्रवृत्ती आहे. ही संघटना इस्राईलच्या 'मोसाद'प्रमाणे कपटी आणि षडयंत्रकारी संघटना आहे. आरएसएसने धर्मांध, फॅसिझमचे विष भिनलेला समाज तयार केला आहे. हा भारतीय फॅसिझम तुर्कस्थानमधील रचेप तय्यप अर्देऑन, इराणच्या अयातुल्ला खोमेनी, श्रीलंकेतील राजापाक्षे, अफगाणिस्तानच्या तालिबानी राजवटीसारखा आहे.

क्रमशः ■ ■



# नागपूर आपले आहे, त्याला सांभाळणे आपलच काम आहे !

नागपुरातली कालची घटना ऐकून, पाहून खूप अस्वस्थ वाटतेय. हे आमचे नागपूर नाही. हा आमचा महाराष्ट्रही नाही. नागपुरातील महाल, इतवारी भाग म्हणजे तर अगदी ग्रामीण भागात जसे लोक भाईचाऱ्यानी राहतात, एकमेकांना धरून राहतात, तसे राहणारे. फ्लॅट संस्कृती किंवा फालतूचे मॅनर्स वगैरे तिकडे नाहीतच. घरची साखर संपली काय? चला शेजारी वाटी घेऊन. अगदी 'ह्यांच्या ऑफिसची वेळ झाली तर शेजारच्या चाची कडून चार चपात्या आणायच्या आणि ह्यांच्या डब्यात भरायच्या. चाचीला नंतर देऊच. इतकी जिव्हाळ्याने राहणारी ही माणसे. आज इतकी पेटली कशी? पेटली की पेटवली? हिंदूंचे सण असो की मुसलमानांचे, सगळेच तर मिळून मिसळून करणारा आमचा महाराष्ट्र. इतका कसा बदलतो आहे? का? मला आठवते , माझ्या लहानपणापासून गावात एक मुस्लिम कुटुंब राहत होते. कुणात काहीच दुजाभाव नव्हता. त्यांची फरीदा माझी मैत्रीण होती. आज तर खूपच मित्रमैत्रिणी आहेत. माझा मुलगा शाळेत जायला लागला. त्याचा खास मित्र होता रफिक. माझी मोठी बहीण धामणगाव जवळच्या देवगाव फाट्याजवळच्या हिरपूरची. जवळच अगदी लहानसे एक गाव उसळगव्हाण. तिथे मौला बाबा म्हणून एक फकीर होऊन गेलेत. आमच्या बहिणीकडे म्हणजे बिरे कुटुंबाकडे त्यांची खूप भक्ती. त्यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम आमचे नानासाहेब बिरे [माझे जिजाजी] दर वर्षी मोठ्या प्रमाणात आणि मोठ्या उत्साहात करायचे. तिथे मुस्लिम कमी आणि हिंदूच जास्त यायचे. माझी वर्धेची बहीण ठाकरे. चक्क ठाकरे! त्यांचे कुलदैवत फरिदबाबा आहेत. आता या ठाकरे नावाच्या कुणबी परिवाराचे कुलदैवत मुस्लिम फरिदबाबा कसे? हा प्रश्न तुमच्यापैकी अनेकांना पडू शकतो. आम्हाला नाही पडला. आजही ठाकरेंच्या घरून त्यांच्या पुण्यतिथीला मलिदा जातो. ईद आणि मोहरमला खिचडा जातो. माझ्या बहिणीचे सासू सासरे काही फार पुरोगामी वगैरे नव्हते. शंभर वर्षांपूर्वीचे साधारण शेतकरी कुटुंबातले लोक जसे ऑर्थोडॉक्स विचारांचे असायचे तसेच तेही होते. तरीही त्यांच्या घरात फरिदबाबाला इतके का पुजले जात होते असेल? असे अनेक कुटुंब आपल्याकडे आहेत. असतील. इतकी वर्षे या गोष्टी कधी विशेषही वाटल्या नाहीत. आज त्या आवर्जून आठवतात. उसळगव्हाणच्या मौला बाबाच्या कार्यक्रमाला माजी आमदार शरद तसरे, बाबासाहेब घारफळकर, माजी आमदार अरुण अडसड सारे उपस्थिती लावायचे. कुणाच्याही मनात कधी विकल्प आला नाही. आम्ही सोडा, आमची मुले आणि आमच्या नातवंडांनाही असले फालतू प्रश्न कधी पडले नाहीत. पुढल्या पिढीला आपण काय देणार आहोत? आपल्याला काय वाटते, काय हवे, नको हे सांगण्याचा अधिकार प्रत्येकालाच आहे. पण त्यासाठी दंगे घडवून आणणे. त्यांच्या पवित्र हिरव्या चादर वर कुराणाच्या आयात लिहिलेल्या चादरीवर लाथा मारून अपमानित करणे हे चुकीचच आहे ना? रामाला, कृष्णाला लाथा मारलेल्या चालतील काय?



अरूणा सबाने
99700 95562

मित्रांनो, यात आज तुम्ही सहभागी झालात ते स्वेच्छेने की कुणाच्या सांगण्यावरून मला माहिती नाही. पण तुम्हा आंदोलनकर्त्यांना भविष्यात खूप कठीण जाणार आहे. जर तुम्ही पोलिसांच्या हातात सापडलात तर तुमच्यावर कलमे लागली असतील, त्याचे किती दूरगामी परिणाम तुमच्या आयुष्यावर होतील, याचा विचार केलाय का? नोकरी मध्ये तर मोठाच प्रॉब्लेम होईल पण तुमचा पासपोर्ट सुद्धा तुम्हाला मिळणार नाही. त्यावेळी नोकरी द्यायला हे राजकारणी, तो औरंग्या येणार आहेत काय? विचार करा. अस्मिता आम्हालाही आहे. शिवाजी महाराज, संभाजी महाराज आमचीही दैवत आहेत. पण महाराष्ट्राची शांतता आम्हाला अधिक प्यारी आहे. कारण ही शिकवण आम्हाला शिवाजी, जिजाऊंनीच दिली आहे. तेव्हा जरा सबुरीने घ्या. मित्रांनो महाराष्ट्र आपला आहे. नागपूर आपले आहे. त्याला सांभाळणे आपलच काम आहे. शांतता राखा. ■ ■

# बुद्धाचा कन्याकरिता विनय



एकदा तथागत भद्यीय समिप असलेल्या जातीयवनात वास्तव्याला होते. तेव्हा मेंडकाचा पौत्र उगाह तेथे तथागतांच्या भेटीला आला. त्याने तथागतांना वंदन केले आणि निकटच आसनस्थ झाला. आसनस्थ झाल्यावर तो तथागतांना म्हणाला. हे 'तथागता उद्या माझ्या घरी कृपा करून भोजनाला यावे. तथागतांनी मुक संमत्तीने त्या निमंत्रणाचा स्वीकार केला. उगाहाणे पाहिले की तथागतांनी त्यांची प्रार्थना स्वीकारली तेव्हा तो आपल्या असणावरून उठला. त्याने तथागतांना वंदन केले, त्याने तथागतांना प्रदक्षिणा घातली आणि तथागताचा निरोप घेतला. रात्र संपल्यावर प्रातःकाळी तथागतांनी चिवर धारण केले. पात्र घेतले आणि उगाहाच्या घरी प्रस्थान केले. उगाह निवासी पोहोचल्यावर त्यांच्याकरिता प्रस्तुत आसनावर तथागत आसनस्थ झाले. उगाहाने स्वहस्ते तथागतांना विविध प्रकारच्या भोजनांनी समर्पित केले. तथागतांनी आपल्या पात्रातून आपला हात काढून घेतला तेव्हा तो तथागतानिकट बसला आणि म्हणाला, 'तथागता, या माझ्या कन्या आहेत. आपल्या पतिगृह पती कुटुंबात जाणार आहेत. तथागतांनी त्यांना देशना द्यावी. चिरकालपर्यंत त्यांच्या हिताचे आणि सुखाचे निमित्त ठरावा असा उपदेश तथागतांनी त्यांना द्यावा.' तेव्हा तथागत त्यांना उद्देशून बदला, 'हे कन्यांनो, तुम्ही अशा प्रकारे आचरण ठेवावे की. तुमचे मातापिता तुमचे हीत, तुमचे सुख जपावयाच्या हेतूने, तुमचे उदार माता-पिता तुम्हाला ज्या पतीच्या स्वाधीन करतील, त्यांच्याविषयी आदर बाळगून तुम्ही त्यांच्या अगोदर उठावे, त्यांच्या पश्चात निंद्रिस्त व्हावे. तुम्ही मनःपूर्वक तुमचे काम करावे. सर्व वस्तू व्यवस्थित ठेवाव्या. तुमची वाणी मधुर असावी. कन्यांनो, तुमचे आचरण असे असावे. तुम्ही याचा अभ्यास करावा.' 'आणि त्याचप्रमाणे कन्यांनो, तुम्ही पती, त्याचे माता पिता, त्याचे आप्तसंबंधी, साधू संन्यासी यांचा मानसन्मान करावा, आदर सत्कार करावा. ते घरी येताच त्यांना आसन द्यावे त्यांना जल द्यावे. कन्यांनो, या प्रकारे आचरण करावे. कन्यांनो, याचा अभ्यास करावा.' 'आणि या प्रकारे कन्यांनो, तुम्ही पतीगृहीच्या हस्तकलेत. हस्तोधोगात चतुर चपळ असावे. लोकर विणण्याची कला अथवा उद्योग असो, अथवा कापूस विणण्याची कला अथवा उद्योग असो, तुम्ही त्या कलेत त्या उद्योगात दक्ष व्हावे. याप्रकारे दक्षता प्राप्त केल्याने तुम्ही ते काम योग्य प्रकारे करू शकाल, करून घेऊ शकाल. कन्यांनो, तुम्ही या प्रकारच्या आचरणाचा अभ्यास करावा.'

'आणि या प्रकारे हे कन्यांनो, दूत, सेवक, चाकर, कर्मचारी काय काम करतात हे जाणून घ्यावे. त्यांनी काय केले हे समजून घ्यावे. ते कामचुकार तर नाहीत ना हे ओळखावे. त्यांनी काम केले अथवा नाही ते पहावे. तुम्ही रुग्ण्याचे बलाबल ओळखावे. तुम्ही ज्याला जसे लागेल तसे गरिष्ठ भोजन अथवा सुपाचक भोजन द्यावे. अशा प्रकारच्या आचरणाचा तुम्ही अभ्यास करावा.' 'आणि याप्रमाणे कन्यांनो, तुमचा पती, धन, धान्य, सोने, हिरे मोती, रूपये जे काही घरी आणतो त्याला तुम्ही सुरक्षित ठेवावे. त्यावर तुमची नजर असावी. त्यांची देखरेख करावी. कोणीही चोर, दरोडेखोर, लुच्चा लफंगा, उचलेगिरी करणारा त्यांच्यापासून ते सर्व सुरक्षित राहील याची काळजी घ्यावी असे आचरण करावे आणि त्याचा अभ्यास करावा.'

तथागतांचा हा उपदेश श्रवण करून उगाहाच्या कन्या प्रसन्नता पावल्या आणि त्यांनी तथागता प्रति कृतज्ञता व्यक्त केली. ■ ■

तथागताची सत्यगाथा



देविदास राऊत
(बौद्धाचार्य)
मो. 8668238330

# सत्यशोधक पुरोगामी ओबीसी स्त्रियांना लोकशाहीवादी संघटना वाळीत टाकतात...



**स्त्रियांच्या चळवळीत व पुरोगामी चळवळीत ओबीसी स्त्री नेतृत्वाला नाकारण्याची प्रवृत्ती होतीच. पण आता ती खूपच उघड दिसते आहे. पुरोगामी चळवळीतील ओबीसी स्त्रिया फुले, शाहू, आंबेडकरवादी असून त्या सत्यशोधक आहेत आणि असंघटित उत्पादक वर्गातील आहेत, म्हणून हे घडत आहे का? त्या नेतृत्वात आल्या तर आपल्या हातून शेतकरी, असंघटित कामगार, विस्थापित, स्थलांतरित कष्टकरी स्त्रियांचे संघटन निघून जाईल का? त्यांच्या जोरावर त्रिवर्णतील स्त्रियांना जे funding मिळते आहे, ते निघून जाईल का अशी तर भीती या मागे नाही? सध्या लोकशाहीच्या नावाने उत्सव करणाऱ्या लोकांना भाजपमध्ये गेलेले ओबीसी दिसतात. पण आपल्यासोबत असणाऱ्या ओबीसी स्त्री पुरुष नेतृत्वाला ते खड्यासारखे बाजूला करतात. त्यांचे सत्यशोधकी जातीभेद विरोधी विचार त्यांना पेलत नसावेत.**

खरेच 1975 नंतर स्त्रियांच्या चळवळीत ओबीसी स्त्रियांचे योगदान नाही आणि नेतृत्व नाही आणि त्यांनी ब्राम्हणवाद विरोधी पितृसत्तेला धारेवर धरले नाही, अशी स्थिती आहे का? बघू या यांना किती स्त्री चळवळीतील सत्यशोधक फुले-आंबेडकरवादी स्त्रिया माहिती आहेत? माझ्याजवळ मोठी यादी आहे. पण यांची लोकशाही यांना मुबारक. त्यांना जात निहाय जनगणना मान्य असेल असे नाही, पण भारत जोडो यात्रेत आपले झेंडे, वारस यांना सोशल मीडियावर फोटो, reels येण्या पुरते संबंध. यांच्यामधील सर्व ब्राम्हणवादी स्त्रिया भाजपा ओरियेंटेड नाहीत असे तुम्हाला म्हणायचे आहे का? यांना पुणेरी मराठीमध्ये बोलत नसलेली कुणी स्त्री कार्यकर्ता चालते का? यांची आपापसात पर्यायी शुद्ध मराठी शब्द शोधण्याची चढाओढ. इथे कशा काय जना, बहिणा चालतील. त्या बहीणाबाई चौधरीच्या अहिराणी शैलीतील मराठी भाषेत न चे ण आणि हाताले चे हाताला असे ब्राम्हणी मराठीत रूपांतर करूनच बोलतात. आता ही कोणती संस्कृती आहे, भाजपा, सनातन, चित्पावन नाही का?

उत्पादक वर्गातील ओबीसीशी यांचे नाते नेता आणि कामगार असे आहेत आणि मनात खूप बसले आहे की 19 व्या शतकात ओबीसी स्त्रियांनी काढले असेल ब्राम्हण स्त्रियांना सुद्धा चिखलातून. पण आम्ही मात्र आता त्यांना आमच्या बरोबरीच्या मानणार नाही, असे तथाकथित पुरोगामी ब्राम्हणवादी स्त्रियांनी अलिखित संकल्प केला आहे. यात त्रिवर्णतील स्त्रियापण सामील आहेत. कारण sc, st, obc, आणि NTDNT यांच्या पेक्षा स्वतःची सुप्रीमसी सिद्ध करताना त्या सावित्री, फातिमा वर प्रेम आहे असे दाखवतात. पण आजच्या सावित्री फातिमा नसून आज आम्हीच नेत्या असे दाखवत स्त्री चळवळीत कधी काम ही केले नसेल त्या स्त्रियांना डोक्यावर घेऊन नाचतात. कारण ही जात युती आहे. वर्ग युती पण आहे. कारण जवळपास एका उच्च मध्यम वर्गातून आलेल्या या स्त्रियांचे आता पुरोगामी चळवळीत कोंडाळे झाले आहे. ते स्त्री अध्ययन, स्त्री आरोग्य चळवळ, स्त्री पर्यावरण चळवळ, शेतकरी स्त्री चळवळ, असंघटित स्त्री कामगार चळवळ, पक्ष आणि युनियनच्या स्त्री आघाडी इत्यादी मध्ये दिसून येतात. दलित स्त्रीवादाने ज्या पद्धतीने वेगळी चूल मांडली, त्यामुळेच आज सत्यशोधक स्त्रीवादी साहित्य संमेलने, सत्यशोधक स्त्री कार्यकर्त्यांची परिषद, राष्ट्रीय ओबीसी महिला संघटना, ओबीसी महिला राजकीय आघाडी, परिषदा फुले-शाहू-आंबेडकरवादी ओबीसी स्त्रिया स्वतंत्र भरवू लागल्या आहेत. 1990 पासून आम्ही अनेक ओबीसी सत्यशोधक स्त्रियांनी महाराष्ट्रात आपला स्वतंत्र ठसा उमटवला आहे. आम्हाला तुमची गरज नाही. जेव्हा तुमच्या नेतृत्वाबद्दल तुमच्या संघटनेतील ओबीसी स्त्रियांना शंका येतील, तेव्हा तुम्हाला पाय उतार व्हावे लागेल. कारण यांच्या जोरावर निधी मिळत असल्याने यांना जागृत होऊ न देणे भाजपा इतकेच पुरोगामी चळवळीतील सर्व जाती धर्मातील ब्राम्हणवादी स्त्रियांना व पुरुषांना खुर्च्या सोडायची वेळ येणार आहे. 'जानवे तोडा, माणसे जोडा' असा नारा देणाऱ्या समाजवादी चळवळीतील नेतृत्वाने किमान आता तरी आपण कुणाला प्रतिनिधित्व देतो याचे मूल्यमापन करायला हवे. पुरोगामी ओबीसी स्त्री कार्यकर्त्या चळवळीत नाहीत हे या आयोजकांनी आता जाहीर करावे आणि सिद्ध पण. तुमच्या स्त्री चळवळीचा इतिहास वेगळा आणि आमचा वेगळा असे असेल तर ते ही जाहीर करावे. आम्ही केवळ गर्दी असतो का हे जाहीर करावे. की एखादीला चूचकारून तू आमचीच ग असे म्हणायचे आणि आपापसात आपली आहे का ग ती अशी तपासणी करायची हे सोडणार असाल तर लोकशाही. नाहीतर तुम्ही सुद्धा सॉफ्ट सफ्रन, सॉफ्ट प्रोग्रेसीव्ह आणि सेविका समितीचा उदारमतवादी स्त्रीवादी चेहेरा असेच म्हणावे लागेल. यावर माझे स्वतंत्र लेखन आहे. इंग्लिशमध्येपण आहे. मराठी, हिंदीत पण आहे. ही माझी मते आहेत. यांचा वापर करताना माझ्या नावासकट करावा, संदर्भ द्यावा ही विनंती. कारण पंगा मी घेत आहे आणि म्हणून माझ्या या मांडणीचे, ब्राम्हणवादी स्त्रीवादाला आव्हान करण्याचे क्रेडिट सुद्धा माझे आहे. ■ ■

स्त्री दास्याचा तुरुंग फोडते....



लता प्रतिभा मधुकर
मो. 9922320338

## वाचकांचे मनोगत

बहुजन सौरभ

# राज्यात उष्णतेची लाट

देशभरात उन्हाळा वाढत असून पुढील काही दिवसात 40 ते 50 अंश सेल्सियस उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. त्यामुळे या उन्हाळ्याच्या दिवसात थंड पाणी किंवा बर्फाचे पाणी पिणे टाळावे आणि साधे पाणी प्यावे असा सल्ला आरोग्य तज्ज्ञांनी दिला आहे. दरम्यान, सध्या मलेशिया, इंडोनेशिया, सिंगापूर आणि इतर देश उष्णतेची लाट अनुभवत आहेत. तापमान 40 अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचल्यावर खूप थंड पाणी न पिण्याचा सल्ला डॉक्टर देतात, कारण असे केल्यास आपल्या लहान रक्तवाहिन्या फुटण्याची किंवा रक्तवाहिन्या अरुंद झाल्याने स्ट्रोकचा झटका येण्याची शक्यता असते. त्याचबरोबर कडक उन्हातून घरी आल्यावर लगेच हात, पाय धुवू नका. त्याआधी किंवा आंघोळ करण्याआधी किमान अर्धा तास थांबा. त्यानंतरच अंघोळ करा, असे न केल्यास त्या व्यक्तीला स्ट्रोकचा झटका येण्याची शक्यता असते, असेही आरोग्य तज्ज्ञांनी सांगितले आहे.

दिलीप मून
वाडी. नागपूर.

